# शिवपुरी सर्वरोग निदान शिबीर संपन्न



प्रतिनिधी

मुंबई,शनिवार: अक्कलकोट निवासी श्री स्वामी समर्थ महाराजांच्या पावन नगरीत शुद्ध आयुर्वेदिक उपचार व अग्निहोत्राचे उगमस्थान म्हणून ओळखल्या जाणाऱ्या शिवपुरी आश्रमातर्फे घेण्यात आलेले सर्व रोग निदान शिबीर उत्साहात संपन्न झाले.

या शिबीरात आर्युवेदीक सर्वनिदान, नेत्रचिकित्सा, मधुमेह चिकित्सा, आहार विषयक मार्गदर्शन व कायरोप्रॅक्टीक चिकित्सा प्रामुख्याने करण्यात आल्या आहेत. यामध्ये शिवपुरी आश्रमाचे प्रमुख वैद्य पुरुषोत्तम राजीमवाले हे स्वत:च वैद्य किर्ती कटारे यांनी आयुर्वेद चिकित्सा व उपचार केले. सोनाली सुरतकर यांनी शिबीरार्थींना आहार विषयक मार्गदर्शक केले. रामदास ठणके, राहूल जोशी व स्वप्निल कुलकर्णी यांनी मधुमेह चिकित्सा व नेत्र चिकित्सा केली. या १० दिवसीय शिबीराचा लाभ ४५०० रूग्णांनी घेतला. या शिबीरात प्राचीन व आधुनिक गोष्टीचा अनोखा संगम शिबीर संयोजकांनी घडवून आणला होता. म्हणजे आयुर्वेद, कायरोप्रॅक्टीक या प्राचीन चिकित्सा करण्यात आल्या त्यावेळी आलेल्या रूग्णांना संगणकीकृत ओळखपत्रे व केसपेपर्स देण्यात आले. कायरोप्रॅक्टीक चिकित्सा करण्यासाठी अमेरिकेतून डॉ.जॉन पालमर यांच्या नेतृत्वाखाली २४ तज्ञ कायरोप्रॅक्टर्सची टीम शिवपुरी येथे आली होती व या २४ तज्ञांनी अत्यंत सेवाभावे या रूग्णाची सेवा केली. हे २४ तज्ञ अमेरिकन नागरिक असून त्यांनी अत्यंत कठोरपणे शिवपूरी आश्रमाचे सर्व नियम पाळून येथे होणाऱ्या दैनंदिन कार्यक्रमात सहभाग घेतला. अमेरिकन नागरिक असलेल्या तज्ञांनी या १० दिवसाच्या कालावधीमध्ये पूर्णत: शाकाहार घेतला. अग्निहोत्र, योगासने, प्राणायाम,वैदीक जीवन पद्धती ई सर्व गोष्टींचे त्यांनी काटेकोरपणे पालन केले आहे असे आश्रमाचे व्यवस्थापक जितेंद्र कुमार जाजू यांनी सांगितले.

या कायरोप्रॅक्टीक उपचार पद्धतीचा लाभ महाराष्ट्र तसेच लगतच्या राज्यातील लोकांनीही घेतला आहे. यामध्ये मुख्यत्वे शरीराच्या आखडलेल्या शिरा, अर्धांगवायू, गुडघेदुखी, मानदुखी, पाठदुखी, हातापायामध्ये अवसान नसणे इं. रोगावर चांगला फायदा झालेला दिसून आलेले आहे. या कायरोप्रॅक्टीक चिकित्सा पद्धतीमध्ये आपल्या पाठीच्या मणक्यातून संपूर्ण शरीरभर मज्जातंतूचे जाळे पसरलेले असते. मानवाच्या बदलत्या जीवनपद्धती, यामुळे मणक्याचे आजार व मज्जासंस्थेशी निगडीत आजार वाढले आहेत अशा सर्व रूग्णांच्या मणक्यांची ठेवण हे तज्ञ व्यवस्थित करतात. या उपचारासाठी स्पेशल विशिष्ट अशा टेबलाची आवश्यकता असते असे टेबल्स प्रत्येकाने आपल्यासोबत अमेरिकेतून आणले होते. या चिकित्सा पद्धतीमध्ये कुठल्याही प्रकारचे औषधाचे सेवन केले जात नाही. यामुळेच याला कुठलेही साईट इफेक्टस नाहीत.

२५ जून रोजी सुरू झालेले हे सर्वरोग निदान शिबीर ५ जुलै रोजी संपन्न झाले. या शिबीराचा लाभ खरोखरच जीर्ण व्याधी असलेल्या रूग्णांनी घेतलेला आहे. फोनवर बुकींगची सुविधा उपलब्ध करून दिल्यामुळे दुरदूरहून आलेल्या रूग्णांच्या वेळेचा व पैशाची बचत झाली आहे.

आलेल्या रूग्णांना व त्याचबरोबर असलेल्या नातेवाईकांना शिवपुरी आश्रमातर्फे मोफत अन्नदानाची सोय करण्यात आली होती. या अन्नदानामुळे हजारो लोकांची सोय झाली.

या सर्व रोग निदान शिबीरास या दहा दिवसाच्या कालावधीमध्ये समाजातील अनेक मान्यवरांनी भेट देऊन या चिकित्सा पद्धतीचा लाभ घेतला आहे. या सर्वरोग निदान शिबीरासाठी शिवपुरी आश्रमाचे कार्यकर्ते सदैव तत्पर होते. याशिबीरात अमेरिकन तज्ञ व रूग्ण यांच्यामध्ये दुभाषाचे काम करण्यासाठी निरनिराळ्यात गावातून कार्यकर्ते येथे उपस्थित होते. शरद नातु, हिबारे, राजपूत, डॉ.जाधव, बाग, गायत्री पारखे, पाटील, मृगांक खेर, योगिता, नेपाळे बंधू, प्रांजल, सरिता, कौस्तुंभ जोशी, तुकाराम चिकणे ,विद्याधर पारखे, सागर जाजू, दंडवते, पेंडसे, अमर चौधरी, वाळुंजकर, बालाजी कोळी, इत्यादींनी या शिबीरासाठी अथक परिश्रम घेतले.

या शिबीराच्या नावनोंदणी व केसपेपर्स या संगणीकृत विभागाचे काम सोनल जाजू व शारदा माता इंग्रजी शाळेच्या विदयार्थ्यांनी व मुंबई येथील भुपेंद्र , संदेश मोडे व गिरीष यांनी सांभाळले. या शिबीराचा माध्यमातून हजारो पिडीत रूग्णांना व्याधीपासून मुक्त करण्यास यश आल्याबद्दल परमेश्वर आभार आम्ही मानतो व अशा प्रकारचे शिबीर पुढील वर्षात परत घेण्याचा मानस शिवपुरी आश्रमातर्फे डॉ. राजीमवाले यांनी व्यक्त केला.